वास्तुशास्त्र परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यातील खाजगी संस्थांना बी.आर्किटेक्चर व एम.आर्किटेक्चर हे अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी व संस्थेतील वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करण्यासाठी मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्र.टिईएम-२००६/(२५१/०६)/तांशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १ जून , २००६

संदर्भ : वास्तूशास्त्र परिषद, नवी दिल्ली यांची
दि.३१.१.२००६,१०.३.२००६,१३.३.२००६ १२.४.२००६,
२४.४.२००६, ची पत्रे.

**शासन निर्णय :** वास्तूशास्त्र परिषद, नवी दिल्ली यांनी त्यांच्या संदर्भाधीन पत्रान्वये खालील संस्थांना शैक्षणिक वर्ष २००६-०७ साठी बी.आर्किटेक्चर व एम.आर्किटेक्चर हे अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी व संस्थेतील वास्तूशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ करण्यासाठी मंजूरी दिली आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|---|
| १. | नाशिक ग्रामीण शिक्षण प्रसारक मंडळाचे ब्रम्हा व्हॅली कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, नाशिक ४२२००४ | बी.आर्किटेक्चर | ४० |
| २. | वास्तुकला रिसर्च फौंडेशन १, प्रॉस्पेक्ट, चेंबर, जी.पी.ओ.जवळ, त्र्यंबक रोड, नाशिक ४२२००१ | बी.आर्किटेक्चर | ४० |
| ३. | दि.सुलतान खान एज्युकेशनल ट्रस्टचे अस्मिता कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, एन.एच.इंग्लिश अकॅडमी, नया नगर, मिरा रोड (पूर्व), जि.ठाणे ४०११०७ | बी.आर्किटेक्चर | ४० |

दिनांक ...
कार्यासन क्र. ...

SPSMBH'S COLLEGE OF ARCHITECTURE
EST. 1984

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | महर्षि कर्वे स्त्री शिक्षण संस्थेचे डॉ.भानुबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर फॉर वुमेन, कर्वे नगर, पुणे | १) मास्टर ऑफ आर्किटेक्चर (इन्व्हॉरमेंटल आर्किटेक्चर ) | २० |
| | | २) मास्टर ऑफ आर्किटेक्चर (लॅण्डस्केप आर्किटेक्चर ) | २० |
| ५. | महर्षि कर्वे स्त्री शिक्षण संस्थेचे डॉ.भानुबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर फॉर वुमेन, कर्वे नगर, पुणे | १) बॅचलर ऑफ आर्किटेक्चर (इंटेरिअर डिझाईन ) | ४० |
| | | २) बी.आर्किटेक्चर | ६० वरुन ८० |
| ६. | श्री.प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डींग हाऊसचे कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, शिवाजी पेठ, कोल्हापूर | मास्टर ऑफ आर्किटेक्चर (कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट) | २० |
| ७. | सिंहगड कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, सर्वे नं.४४/१, वडगांव (बुद्रुक) सिंहगड रोड, पुणे | बॅचलर ऑफ आर्किटेक्चर (इंटेरिअर डिझाईन) | ४० |
| ८. | एन.डी.एम.व्ही.पी. समाजाचे कॉलेज ऑफ आर्किटेक्चर नाशिक | १) मास्टर ऑफ आर्किटेक्चर (व्हॅल्युएशन ॲण्ड अर्बीट्रेशन) | २० |
| | | २) मास्टर ऑफ आर्किटेक्चर (कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट ) | २० |

२. सदर मंजूरी ही खालील अटी व शर्तीवर देण्यात येत आहे :-

१) प्रस्तुत बाबतीत वास्तूशास्त्र परिषदेने विहीत केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या अटींची पूर्तता करणे संस्थेस बंधनकारक राहील.

२) सदरहू नवीन अभ्यासक्रमासाठी व प्रवेशक्षमता वाढीच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने संबंधीत विद्यापीठाची मान्यता घेणे आवश्यक राहील.

३) संबंधित संस्थेने, संचालक, तंत्रशिक्षण यांजकडे आवश्यक ती संचित ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशिर बाबींची पूर्तता करावी.

४) प्रस्तावित अभ्यासक्रमासाठी जे प्रवेश नियम लागू करण्यात आलेले आहेत त्याप्रमाणे विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा.

SPSMBH'S COLLEGE OF ARCHITECTURE
EST. 1984